## L. A. BILL No. XXIV OF 2025.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

## सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.

## महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.

**(विधानसभेने दिनांक २० मार्च २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९५८ चा ६५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम ३ मध्ये,— १९५८ चा ६५.

(एक) पोट-कलम (१क) मधील, परंतुकातील, “रुपये २० लाखांपर्यंत” या मजकुराऐवजी, “रुपये तीस लाखांपर्यंत” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पोट-कलम (१ड) मधील, दुसऱ्या परंतुकातील, “रुपये २० लाखांपर्यंत” या मजकुराऐवजी, “रुपये तीस लाखांपर्यंत” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) पोट-कलम (१फ) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

“(१ग) पोट-कलमे (१) व (१ई) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेन्स, क्रॉम्प्रेसर्स, प्रोजेक्टर्स किंवा खनित्रे यांसारख्या सर्व मोटार वाहनांवर आणि ओझे लादलेले असताना ज्याचे नोंदणीकृत वजन ७५०० किलोग्रॅमपेक्षा अधिक नसेल अशा माल किंवा सामग्री यांची राज्यामध्ये, वाहतुकीकरिता वापरल्या जाणाऱ्या हलक्या मालवाहू वाहनांवर, जर त्यांची महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, २०२५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर नोंदणी केलेली असेल तर, सहाव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने, अशा वाहनांच्या हयातीकरिता एकाच वेळी द्यावयाचा कर आकारण्यात येईल व वसूल करण्यात येईल.”. २००५ चा महा. .

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (२) मधील,—

(१) “किंवा (१ई)” या मजकुराऐवजी, “, (१ई) किंवा (१ग)” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (अ) मध्ये, “उपखंड (एक)” या मजकुरानंतर, “आणि (१ग)” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (क) मध्ये, उपखंड (तीन) मधील, “किंवा, यथास्थिति, पोट-कलम (१फ)” या मजकुराऐवजी, “, (१फ) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (१ग)” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ याच्या तिसऱ्या अनुसूचीची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या तिसऱ्या अनुसूचीमध्ये, भाग एक मधील, स्तंभ (२) मध्ये,—

(१) नोंद (३) मधील,—

(क) उप-नोंद (अ) मधील, “वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के” या मजकुराऐवजी, “वाहनाच्या किंमतीच्या ८ टक्के” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) उप-नोंद (ब) मधील, “वाहनाच्या किंमतीच्या ८ टक्के” या मजकुराऐवजी, “वाहनाच्या किंमतीच्या ९ टक्के” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) उप-नोंद (क) मधील, “वाहनाच्या किंमतीच्या ९ टक्के” या मजकुराऐवजी, “वाहनाच्या किंमतीच्या १० टक्के” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) स्तंभ (२) मध्ये, नोंद (३) नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

“(४) बॅटरीवर चालणारे मोटार वाहन : जर वाहनाची किंमत ३० लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, वाहनाच्या किंमतीच्या ६ टक्के.”.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६५ यात सहावी अनुसूची जादा दाखल करणे.

**६.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या पाचव्या अनुसूचीनंतर, पुढील अनुसूची जादा दाखल करण्यात येईल :—

## “सहावी अनुसूची

(कलम ३ (१ग) पहा)

| अ. क्र. | मोटार वाहनाचे वर्णन | नोंदणीच्या वेळेस एकाच वेळेस द्यावयाचा कर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | क्रेन्स, क्रॉम्प्रेसर्स, प्रोजेक्टर्स किंवा खनित्रे यांसारखी बांधकामाकरिता वापरली जाणारी कोणतीही मोटार वाहने. | मोटार वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के. |
| २. | ओझे लादलेले असताना, ज्याचे नोंदणीकृत वजन ७५०० किलोग्रॅमपेक्षा अधिक नसेल अशी माल किंवा सामग्री यांची वाहतुकीकरिता वापरली जाणारी हलकी मालवाहू वाहने. | मोटार वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के.”. |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम (१९५८ चा ६५) या अन्वये आकारण्यात येत असलेल्या मोटार वाहन करासंबंधी, वित्तीय वर्ष, २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अंतर्भूत असलेले प्रस्ताव अंमलात आणण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमात पुढीलप्रमाणे सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते :—

(१) दुचाकी, तिचाकी, मोटार गाडी व ओम्नी बस यांच्या एकाच वेळी द्यावयाच्या कराच्या कमाल मर्यादेमध्ये तीस लाख रुपयांपर्यंत वाढ करणे ;

(२) संपीडित नैसर्गिक वायुवर किंवा द्रवरूप पेट्रोल वायुवर चालविल्या जाणाऱ्या वाहनांवरील कराचा दर एक टक्क्याने वाढविणे ;

(३) तीस लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर, वाहनांच्या किंमतीच्या सहा टक्के दराने कर आकारणे ;

(४) क्रेन्स, कॉम्प्रेसर्स, प्रोजेक्टर्स व खनित्र यांसारख्या बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर, नोंदणी करण्याच्या वेळी, वाहनांच्या किंमतीच्या सात टक्के दराने, एकाच वेळी द्यावयाचा कर आकारणे ;

(५) ओझे लादलेले असताना ज्याचे नोंदणीकृत वजन ७५०० किलोग्रामपेक्षा अधिक नसेल अशा, माल किंवा सामग्री यांची वाहतूक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांवर, वाहनांच्या किंमतीच्या सात टक्के दराने, एकाच वेळी द्यावयाचा कर आकारणे.

(६) अन्य काही अनुषंगिक सुधारणा करणे.

२. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १८ मार्च, २०२५.

**प्रताप सरनाईक.**
परिवहन मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड १ (२).—** या खंडान्वये, ज्या दिनांकास, हा अधिनियम अंमलात येईल तो दिनांक, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

## वित्तीय ज्ञापन

वित्तीय वर्ष, २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अंतर्भूत असलेले प्रस्ताव अंमलात आणण्यासाठी, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम (१९५८ चा ६५) याच्या कलम ३ व तिसरी अनुसूची यामध्ये सुधारणा करण्यासाठी आणि त्यामध्ये नवीन अनुसूची जादा दाखल करण्यासाठी विधेयक प्रस्तावित केले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल अशी कोणतीही तरतूद, या विधेयकात नाही.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२५ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

(शा.म.मु.) एचबी ३०१४—३ (४४५—३-२०२५)

**सन २०२५ चे वि. स. वि. क्रमांक २४.— महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.**

**(महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ यातील उतारे.)**

**(सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६५.)**

**१.** व **२.** * * * *

**३.** (१) * * * * कर बसविणे.

(१ ग) (क) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या सर्व मोटार सायकलींवर आणि तिचाक्यांवर त्यांच्या संपूर्ण आयुर्मयादेच्या कालावधीसाठी पुढील दराने एकाच वेळी द्यावयाचा कर बसविण्यात व वसूल करण्यात येईल,—

(एक) या पोट-कलमाच्या तरतुदी अंमलात आल्याच्या दिनांकानंतर (या पोट-कलमात यानंतर ज्याचा निर्देश "उक्त दिनांक" असा करण्यात आला आहे) त्यांची नोंदणी करण्यात आली असेल त्याबाबतीत, दुसऱ्या अनुसूचीच्या भाग एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;

(दोन) उक्त दिनांकापूर्वीच त्यांची नोंदणी करण्यात आली असेल आणि त्या वाहनांवर पोट-कलम (१) अन्वये आधीच कर भरण्यात आला असेल त्याबाबतीत, दुसऱ्या अनुसूचीच्या भाग दोन मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांनी;

(तीन) जर त्यांची प्रथम नोंदणी इतर कोणत्याही राज्यात झालेली असेल आणि त्यानंतर त्यांचे हस्तांतरण महाराष्ट्र राज्यात झाल्यावर उक्त दिनांकानंतर त्यांना नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यात आले असेल तर, दुसऱ्या राज्यामध्ये त्यांची प्रथम नोंदणी झाल्याचा महिना विचारात घेऊन, दुसऱ्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;

(क) खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दुसऱ्या अनुसूचीच्या **भाग एक** किंवा **भाग दोन** मध्ये विनिर्दिष्ट केलेला एकाच वेळी द्यावयाचा कर बसविण्यात व वसूल करण्यात येईल,—

(एक) खाजगी व्यक्ती, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, विद्यापीठ किंवा शैक्षणिक परिसंस्था नसेल अशा एखाद्या व्यक्तीने ती राज्यामध्ये वापरात असलेल्या किंवा तिने वापरासाठी ठेवलेल्या मोटार सायकलीवर किंवा तिचाकीवर, दुप्पट दराने,

(दोन) आयात केलेल्या मोटार सायकलींवर किंवा तिचाकींवर दुप्पट दराने.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "मोटार सायकल व तिचाकी" या शब्दप्रयोगामध्ये, मोटार स्कूटर, मोपेड व यंत्रशक्तीने चालविता येण्याची सोय असलेली सायकल यांचा समावेश होतो :

परंतु आणखी असे की, या पोट-कलमान्वये नोंदणी केल्या जाणाऱ्या सर्व प्रकाराच्या वाहनांसाठी कराची कमाल मर्यादा ही, रूपये २० लाखांपर्यंत असेल.

(१घ) (क) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या सर्व मोटार गाड्यांवर आणि ओम्नी बसगाड्यांवर :—

(एक) जर त्यांची नोंदणी मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, १९९७ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर झालेली असेल तर, तिसऱ्या अनुसूचीच्या भाग एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;

(दोन) जर त्यांची नोंदणी उक्त दिनांकापूर्वी झालेली असेल आणि पोट-कलम (१) अन्वये त्यांच्यावरील कर आधीच भरण्यात आलेला असेल तर, तिसऱ्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;

(तीन) जर त्यांची नोंदणी प्रथम इतर कोणत्याही राज्यात झालेली असेल आणि त्यानंतर त्यांचे महाराष्ट्र राज्यात हस्तांतरण झाल्यावर उक्त दिनांकानंतर त्यांना नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यात आले असेल तर, दुसऱ्या राज्यामध्ये त्यांची प्रथम नोंदणी झाल्याचा महिना विचारात घेऊन, तिसऱ्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;

अशा सर्व वाहनाच्या आयुर्मर्यादेकरिता एकाच वेळी द्यावयाचा कर बसविण्यात व वसूल करण्यात येईल;

(ग) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मोटारगाडीवर किंवा ओम्नी बसगाडीवर तिसऱ्या अनुसूचीच्या **भाग एक** किंवा **भाग दोन** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एकाच वेळी द्यावयाचा कर पुढीलप्रमाणे बसविण्यात व वसूल करण्यात येईल :—

(एक) भारतात निर्मिती केलेल्या किंवा भारतात आयात केलेल्या आणि खाजगी व्यक्ती, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, विद्यापीठ किंवा शैक्षणिक परिसंस्था नसेल अशी एखादी व्यक्ती, राज्यामध्ये वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार गाडीवर किंवा ओम्नी बसगाडीवर दुप्पट दराने;

(दोन) भारतामध्ये आयात केलेल्या आणि खाजगी व्यक्ती, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, विद्यापीठ किंवा शैक्षणिक परिसंस्था असेल अशी एखादी व्यक्ती राज्यामध्ये वापरत असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार गाडीवर किंवा ओम्नी बसगाडीवर दुप्पट दराने :

परंतु, उप-खंड (१) किंवा (२) अन्वये दुप्पट दराने एकवार द्यावयाचा असा कर, वाहनाच्या किंमतीच्या २० टक्यांपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, आणखी असे की, या पोट-कलमान्वये नोंदणी केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी कराची कमाल मर्यादा ही, २० लाखांपर्यंत असेल.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमामध्ये वापरण्यात आलेल्या "ओम्नी बसगाडी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जिची आसनक्षमता बारापेक्षा जास्त नाही अशी, वाहतूक वाहनाखेरीज इतर ओम्नी बसगाडी असा, आहे.

(१ई) ते (१फ) * * * *

(२) व (३) * * * *

**३अ.** व **३ब**. * * * *

कराचा भरणा.

**४.** (१) * * * *

(२) कलम ३ च्या यथास्थिती, पोट-कलम (१ग), (१घ), (१ङ) किंवा (१फ) अन्वये देय असलेला एकाच वेळी द्यावयाचा कर हा.—

(क) पोट-कलमे (१ग), (१घ), (१ङ) आणि (१फ) या प्रत्येकाच्या खंड (क), उप-खंड (एक) मध्ये निर्देशिलेल्या मोटार वाहनांच्या बाबतीत, नोंदणीच्या वेळी ;

(ख) व (ग) * * * *

(३) * * * *

(४क) * * * *

**४.** ते **१५.** * * * *

कर व व्याज न भरता मोटार वाहन कब्जात किंवा नियंत्रणाखाली ठेवणे, अपुरे व खोटे प्रतिज्ञापन करणे वगैरेबद्दल शास्ती.

**१६.** (१) जी कोणतीही व्यक्ती,—

(क) व (ख) * * * *

(ग) कलम १५, च्या खंड (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करीत

असताना कोणत्याही अधिकाऱ्यास अडथळा करील किंवा त्या कलमातील खंड (ख) अन्वये अशा अधिकाऱ्याने मोटार वाहन थांबविण्यास सांगितले असता तसे करण्यात कसूर करील, त्या व्यक्तीस सिद्धापराध ठरविण्यात आले असता—

(एक) व (दोन) * * *

(तीन) अपराधाबद्दल दोषी ठरलेली व्यक्ती ही, ज्यावर कलम ३ च्या पोट-कलम (१ग), (१घ), (१ङ) किंवा यथास्थिति पोट-कलम (१च) अन्वये वेळोवेळी कर बसविण्यात आलेला आहे अशा मोटार गाडीचा किवा ओम्नी बसगाडीचा नोंदणीकृत मालक असेल तेव्हा द्रव्यदंड तीनशे रुपयाहून कमी असणार नाही आणि तो अशा वाहनाच्या संबंधात, देय असणाऱ्या एकाच वेळी द्यावयाच्या कराच्या रकमेइतका वाढविता येईल, आणि अशी व्यक्ती कलमाखालील अपराधाबद्दल पूर्वीसुद्धा दोषी ठरविण्यात आली असेल त्याप्रसंगी, द्रव्यदंड पाचशे रुपयांहून कमी असणार नाही आणि तो अशा वाहनाच्या संबंधात देय असणाऱ्या एकाच वेळी द्यावयाच्या कराच्या दुपटीएवढ्या रकमेइतका वाढविता येईल. आणि;

(चार) * * * *

(२) ते (५) * * * *

**१७.** ते **२५.** * * * *

**पहिली अनुसूची.** * * * *

**दुसरी अनुसूची.** * * * *

## तिसरी अनुसूची

[ कलम ३ (१-घ) आणि कलम ९ (६) आणि (७) पहा ]

भाग एक

| मोटार वाहनाचे वर्णन<br>(१) | नोंदणीच्या वेळी एकाच वेळी द्यावयाचा कर<br>(२) |
|---|---|
| मोटार गाड्या आणि ओम्नी बसगाड्या | (१) * * *<br>(२) * * *<br>(३) उत्पादकाने मूळ उपकरणासह सीएनजी / एलपीजी कीट बसविलेली, संपीडीत नैसर्गिक वायुवर (सीएनजीवर) किंवा द्रवरूप पेट्रोल वायुवर (एलपीजीवर) चालणारी नवीन वाहने :<br>(अ) जर वाहनाची किंमत रुपये १० लाखांपर्यंत असेल तर, वाहनाच्या किमतीच्या ७ टक्के :<br>(ब) जर वाहनाची किंमत रुपये १० लाखांपेक्षा अधिक परंतु रुपये २० लाखांपर्यंत असेल तर, वाहनाच्या किमतीच्या ८ टक्के;<br>(क) जर वाहनाची किंमत रुपये २० लाखांपेक्षा अधिक असेल तर, वाहनाच्या किमतीच्या ९ टक्के. |

**चौथी अनुसूची.** * * * *

**पाचवी अनुसूची.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.]**

**[ महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. प्रताप सरनाईक,**
परिवहन मंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक २० मार्च २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.